# स्वातंत्र्य

**विचार स्वातंत्र्य** म्हणजे काय?

तुम्हाला स्वतःच्या मनाने विचार करण्याचा, प्रश्न विचारण्याचा, मत बनवण्याचा आणि योग्य-अयोग्य ठरवण्याचा अधिकार. कोणालाही "तुला असंच विचारायलाच हवं" असं जबरदस्तीने सांगता येत नाही.

शाळेतील सोपी उदाहरणं

1) प्रश्न विचारण्याचं स्वातंत्र्य

- शिक्षकांनी सांगितलं: "पाणी 100°C ला उकळतं."
- तुम्ही विचारू शकता: "उंच डोंगरावरही तसंच उकळतं का?"
  हेच विचार स्वातंत्र्य.

2) मत वेगळं असण्याचा अधिकार

- वर्गात चर्चा: "मोबाईल शाळेत आणावा का?"
- तुम्ही "हो" किंवा "नाही" असं कारण देऊन मत मांडू शकता.
  वेगळं मत असलं म्हणून शिक्षा देता येत नाही.

3) आवड-निवड करण्याचं स्वातंत्र्य

- तुम्हाला क्रिकेट नाही, कबड्डी आवडते.
- "सगळ्यांनी क्रिकेटच आवडलं पाहिजे" असं कोणी ठरवू शकत नाही.
  तुमची आवड वेगळी असू शकते.

4) माहिती मिळाल्यावर मत बदलणं

- आधी तुम्हाला वाटतं: "हा नियम चुकीचा आहे."
- नंतर कारण समजल्यावर तुम्ही म्हणता: "ठीक आहे, नियम बरोबर आहे."
  मत बदलणंही विचार स्वातंत्र्याचाच भाग आहे.

5) अंधश्रद्धेला प्रश्न विचारणं

- कोणी म्हणालं: "हे करू नको, अपशकुन होईल."
- तुम्ही विचारू शकता: "याचा पुरावा काय?"
  हेही विचार स्वातंत्र्य.

○ मला सांग, **तू किती शिकली आहेस**? तुझी आई किती शिकली? आजी? त्यांच्या आया शाळेत गेल्या नव्हत्या. का गेल्या नव्हत्या? परिस्थिती नव्हती, शाळा नव्हत्या. शाळेत जायचा अधिकारच नाही, कारण असा नियमच होता की महिलांनी शाळेत जायचा विचार सुद्धा करायचा नाही! याउलट संविधान काय म्हणतंय? कुठे काहीही लिहिलेलं असेल, पण आपण मात्र विचार करू शकतो.

○ **अभिव्यक्ती** - जो विचार करतो, तो मांडण्याचे स्वातंत्र्य आहे.

**अभिव्यक्ती** स्वातंत्र्य म्हणजे "हवे ते करणे" नाही.

- शिवीगाळ/अपमान करणे चालत नाही.
- खोट्या अफवा पसरवणे चालत नाही.
- मारामारी/धमकी देणे चालत नाही.
- इतरांच्या हक्कात अडथळा आणणे (उदा. वर्गात गोंधळ करून शिकू न देणे) चुकीचे.

म्हणजे: विचार मोकळे, पण वर्तन सभ्य आणि नियमांच्या चौकटीत.

○ **विश्वास** - ठेवायचा आहे, ठेवा, नसेल ठेवायचा, नका ठेवू.

○ **श्रद्धा** - बाळगायची आहे, बाळगा, नसेल बाळगायची, नका बाळगू.

○ **उपासना** - करायची, करा, नसेल करायची, नका करू.

○ म्हणजे संविधानाने आपल्याला बोलण्याचं, खाण्याचं, फिरण्याचं स्वातंत्र्य दिलं आहे. भाषा, पोशाख, अन्न, श्रद्धा, पूजा-व्रत, सण-उत्सव, कला (नृत्य, संगीत, चित्रकला), सामाजिक मूल्यं, परंपरा, व्यवसाय यांचे प्रत्येकाला त्याच्या आवडी निवडी प्रमाणे जगण्याचं स्वातंत्र्य आहे - कोणीच कोणावर जबरदस्ती करू शकत नाही.

○ **हाताची activity** - चला, आता एक काम करुयात. मी सां तसं करुयात. सगळ्यांनी हात वर करा. साईडला करा. खाली करा. आता बघा, हात वर करायचं, खाली करायचं स्वातंत्र्य होतं. घेतलं. साईडला करायचं स्वातंत्र्य होतं. घेता आलं नाही, कारण मुलं बसलेली होती. मग आपण काय केले? आपण हात आखूड केले. कोणी हात धरले होते का आपले? नाही. मग आपल्याला स्वातंत्र्य घेण्यापासून कोणी रोखलं. आपणच आपले हात आखूड केले, का, कारण आपण दुसऱ्याची काळजी घेतली. म्हणजे आपल्याला स्वातंत्र्य आहे पण त्याला मर्यादा सुद्धा आहेत. आपल्या स्वातंत्र्याने दुसऱ्याला इजा किंवा त्रास होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

- ★ **चॉकलेट Activity** – माझ्या हातात काही चॉकलेट आहेत. ज्याला पाहिजे तेवढ्या घ्या. फक्त लगेच खाऊ नका. थोड्या वेळाने खा. (मुलं घेतात.) तुम्ही खाऊ शकता परंतु यापैकी एका चॉकलेटमध्ये वीष आहे. (मुलं घाबरतात.) याचा अर्थ तुम्हांला चॉकलेट घेण्याचे स्वातंत्र्य आहे परंतु, भीतीच्या वातावरणात स्वातंत्र्यावर मर्यादा येते.